**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 7 No. 15** **January – February - 2026**

# पालघर जिल्ह्यातील बालकांमधील कुपोषण : सामाजिक-आर्थिक विश्लेषणात्मक अभ्यास

**अनंता प्रभू पवार [१], डॉ. अंबादास कापडी[२]**
*[१]संशोधक विद्यार्थी, के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक*
*[२]संशोधक मार्गदर्शक, गु.मा. दा. कला, भ. वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर, जिल्हा नाशिक*
*Corresponding Author – अनंता प्रभू पवार*
**DOI - 10.5281/zenodo.18863687**

**सारांश:**

*पालघर जिल्ह्यात कुपोषण ही गंभीर समस्या असून, आदिवासी भागातील मुले विशेषतः वाढ खुंटणे **(stunting)**, कमी वजन **(underweight)** आणि क्षीण **(wasting)** असण्याचे प्रमाण जास्त आहे, ज्याला अपुऱ्या आहाराची विविधता, गरिबी आणि स्थलांतरण कारणीभूत आहे; यासाठी आरोग्य विभाग आणि स्वयंसेवी संस्था संयुक्तपणे काम करत आहेत, ज्यामुळे कुपोषित बालकांच्या संख्येत काही प्रमाणात घट झाली आहे, तरीही हा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. पालघर जिल्हा हा महाराष्ट्रातील आदिवासीबहुल जिल्हा असून येथील भौगोलिक, सामाजिक व आर्थिक परिस्थिती इतर जिल्ह्यांपेक्षा वेगळी आहे. या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर वारली, कातकरी, ठाकर, कोळी इत्यादी आदिवासी जमाती वास्तव्यास आहेत. शेतीवर अवलंबून असलेली अनिश्चित उपजीविका, दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव, आरोग्यसेवांपर्यंत मर्यादित पोहोच आणि अपुरा आहार या कारणांमुळे पालघर जिल्ह्यात कुपोषण ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे.*

***बीजशब्द: : बालकांमधील कुपोषण, सामाजिक-आर्थिक घटक, आदिवासी समाज, सार्वजनिक धोरण, पालघर जिल्हा***

**प्रस्तावना:**

पालघर जिल्हा हा २०१४ साली ठाणे जिल्ह्यातून वेगळा होऊन स्वतंत्र जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. या जिल्ह्याची लोकसंख्या प्रामुख्याने ग्रामीण व आदिवासी असून वारली, कातकरी, ठाकर, महादेव कोळी यांसारख्या जमाती मोठ्या प्रमाणावर येथे वास्तव्यास आहेत. जिल्ह्याचा भौगोलिक भाग डोंगराळ, जंगलांनी वेढलेला व पावसावर अवलंबून असलेला असल्याने शेती उत्पादन मर्यादित आहे. रोजगाराच्या संधींचा अभाव, स्थलांतर, दारिद्र्य आणि आर्थिक असुरक्षितता यामुळे येथील कुटुंबांना पुरेसा व पोषणयुक्त आहार मिळणे कठीण जाते. पालघर जिल्हा हा महाराष्ट्रातील एक आदिवासीबहुल जिल्हा आहे. भौगोलिक दुर्गमता, दारिद्र्य, कमी शैक्षणिक स्तर आणि अपुरी आरोग्य सुविधा यांमुळे येथे बालकांमध्ये कुपोषणाची समस्या तीव्र स्वरूपात आढळते. या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यातील बालकांमधील कुपोषण व त्यास कारणीभूत सामाजिक-आर्थिक घटकांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

**संशोधनाची गरज:**

1) पालघर जिल्ह्यात कुपोषणाचे प्रमाण तुलनेने जास्त आहे.
2) आदिवासी समाजातील सामाजिक-आर्थिक परिस्थिती कुपोषणावर कसा परिणाम करते हे समजून घेणे आवश्यक आहे.
3) शासकीय पोषण व आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी तपासणे गरजेचे आहे.
4) कुपोषण निर्मूलनासाठी धोरणात्मक उपाय सुचविणे ही काळाची गरज आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) पालघर जिल्ह्यातील कुपोषणग्रस्त बालकांचा शोध घेणे.
२) पालघर जिल्ह्यातील कुपोषणग्रस्त बालकांच्या कौटुंबिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
३) पालघर जिल्ह्यातील आर्थिक व सामाजिक घटकांचा कुपोषणग्रस्त बालकांच्या कौटुंबिक परिस्थितीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
४) उपोषणग्रस्त बालकांचा विकासाच्या दृष्टीने कुपोषणाचे परिणाम कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुचवणे.

**संशोधन गृहितके :**

१) पालघर जिल्ह्यामध्ये कुपोषित बालकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.
२) पालघर जिल्ह्यातील कुपोषणग्रस्त बालकांच्या वाढत्या प्रमाणास तेथील आर्थिक व सामाजिक परिस्थिती कारणीभूत आहे.
३) पालघर जिल्ह्यातील शासकीय योजनांमुळे उपस्थित बालकांच्या संख्येत घट होत आहे.

**संशोधन पद्धती :**

नवीन ज्ञान मिळवण्यासाठी किंवा समस्या सोडवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वैज्ञानिक आणि पद्धतशीर दृष्टिकोनांचा अभ्यास होय, ज्यात माहिती गोळा करणे, विश्लेषण करणे आणि निष्कर्ष काढणे यांसारख्या विविध पद्धती आणि तत्त्वांचा समावेश असतो, जसे की गुणात्मक (Qualitative), संख्यात्मक (Quantitative) आणि मिश्र पद्धती (Mixed Methods). यामध्ये संशोधनाची व्याख्या, प्रकार, संशोधन आराखडा (Research Design), डेटा विश्लेषण (Data Analysis) आणि अहवाल लेखन (Report Writing) यांसारख्या महत्त्वाच्या घटकांचा समावेश असतो,

**नमुना निवड:**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. पालघर जिल्ह्यात एकूण ८ तालुके आहेत. या ८ तालुक्यात २०२१ मध्ये कुपोषित बालकांची संख्या ६९०० एवढी आहे. प्रस्तुत संशोधनासाठी पालघर जिल्ह्यातील एकूण ८ तालुक्यातील ६९०० संख्येपैकी १० टक्के याप्रमाणे ६९० कुपोषित बालकांची अभ्यासाठी निवड करण्यात आलेली आहे.

**कुपोषणाची संकल्पना:**

कुपोषण म्हणजे शरीराला आवश्यक असणाऱ्या पोषक घटकांचा अभाव किंवा अतिरेक होणे. बालकांमध्ये प्रामुख्याने अल्पपोषण (Under-nutrition) आढळते, ज्यात वजन कमी असणे, उंची कमी असणे व कमजोरी यांचा समावेश होतो. शरीराचे वाढीसाठी आवश्यक योग्य पोषणमुल्ये असलेला आहार/अन्न न मिळाल्यामुळे वा भूकमारीने होणारी प्राण्यांच्या (विशेषतः अल्पवयीनांच्या) शरीराची स्थिती.पुरेसा व योग्य आहार न घेतल्यामुळे जी अशक्तपणाची व आजारपणाची परिस्थिती निर्माण होते तीला कुपोषण म्हणतात. व त्या व्यक्तीला कुपोषित म्हणता येईल.

**पालघर जिल्ह्यातील कुपोषित बालकांची संख्या:**

पालघर जिल्ह्यातील कुपोषित बालकांची संख्या वेळोवेळी बदलते, परंतु डिसेंबर २०२३ नुसार ती दीड हजाराच्या आसपास होती, जी मागील वर्षापेक्षा कमी असली तरी समस्या कायम असल्याचे दर्शवते. अलीकडील आकडेवारी उपलब्ध नसली तरी, आदिवासी बहुल भागातील तीव्र कुपोषण ही एक गंभीर समस्या आहे आणि विविध सरकारी व स्वयंसेवी संस्थांच्या प्रयत्नांनंतरही, २०२५ पर्यंत सुमारे २५% बालके कमी वजनाची आढळली आहेत, ज्यामुळे ही समस्या अजूनही गंभीर असल्याचे दिसून येते

**तक्ता क्र. १ पालघर जिल्ह्यातील कुपोषित बालकांची संख्या (२०२२-२३)**

| अ.क्र. | तालुके | कुपोषित बालकांची संख्या |
|---|---|---|
| १ | तलासरी | १५९२६ |
| २ | डहाणू | ३३७४४ |
| ३ | विक्रमगड | १३४८५ |
| ४ | जव्हार | १२९८८ |
| ५ | मोखाडा | ८२२७ |
| ६ | वाडा | १४८९५ |
| ७ | पालघर | ३४३५१ |
| ८ | वसई | ४४०५३ |
| | **एकूण** | **१७७६६९** |

**संदर्भ- पालघर जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी २०२२-२३**

पालघर जिल्ह्यात एकूण ८ तालुके आहेत. या आठ तालुक्यात २०२२-२३ या वर्षात कुपोषित बालकांची संख्या १७७६६९ एवढी आहे. पालघर जिल्ह्यात सर्वात जास्त कुपोषित बालकांची संख्या वसई तालुक्यात ४४०५३ एवढे आहे. त्यानंतर पालघर ३४३५१, डहाणू ३३४४४, तलासरी १५९२६, वाडा १४९५ या तालुक्यात आहे. तर सर्वात कमी कुपोषित बालकांची संख्या मोखाडा तालुक्यात ८२२७ एवढी आहे.

**संदर्भ साहित्याचा आढावा:**

**१) श्रीवास्तव राकेश (२०१८):**

यांनी 'उपोषणाची समस्या आणि तंत्रज्ञानाचा वापर' या विषयावर योजना मासिकात लेख प्रकाशित केलेला आहे. भारताला जागतिक महासत्ता बनवण्यासाठी कुपोषणाचे पूर्णपणे निर्मूलन करावे लागेल. कुपोषणाच्या निर्मूलनावर पूर्णपणे लक्ष केंद्रित केल्यास भावी पिढी आरोग्य संपन्न तसेच उच्च क्षमतेची बुद्धिमत्ता असलेली आणि कामाची उत्पादकता वाढवणाऱ्या असतील. कुपोषण नष्ट करण्यासाठी सर्वांना एकत्र आणून आपल्या जबाबदाऱ्या आणि उत्तरादायित्व एकत्रितपणे पार पाडता यावे. यासाठी पोषण आवश्यक आहे.

**२) फेंडरकर अर्चना (२०२२)-**

यांनी 'कुपोषण आणि शासकीय आरोग्य सुविधा' या विषयावर संशोधन लेख सादर केला आहे. देशाची लोकसंख्या ही त्या देशाची खरी साधन संपत्ती असते. देशाचा विकास हा त्या देशातील लोकसंख्या आणि उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्री वर अवलंबून असतो. कुपोषण म्हणजे आजार नव्हे परंतु योग्य आहार, उपासमार व जीवनसत्वांचा अभाव यांचा परिणाम मुलांच्या शरीरावर होतो. अंगावर सूज येणे, मूल रडकी होणे, बाळाची वाढ खुंटणे म्हणजे कुपोषण होय.

**३) पवार संतोष (२०२२)-**

यांनी कुपोषणामुळे आदिवासींच्या सर्वांगीण विकासावर होणाऱ्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे. त्यांनी नंदुरबार जिल्ह्यातील कुपोषित बालकांचा अभ्यास केलेला आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, कुपोषणाचा परिणाम हा बालकांच्या शारीरिक व मानसिक वाढीवर होतो त्यामुळे बालकांची शारीरिक वाढ खुंटते व बौद्धिक विकास होत नाही. कुपोषणाचा परिणाम हा बालकांच्या सर्वांगीण विकासावर होत असतो.

**पालघर जिल्ह्यातील सामाजिक-आर्थिक परिस्थिती:**

पालघर जिल्ह्यातील बहुतांश लोकसंख्या आदिवासी असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेती, मजुरी व जंगलावर आधारित आहे. उत्पन्नाचे स्रोत मर्यादित असल्याने अन्नसुरक्षा व आरोग्य सेवांवर परिणाम होतो. शिक्षणाचा स्तर कमी असल्यामुळे पोषणाबाबतची जागरूकता अभावानेच दिसून येते.

**बालकांमधील कुपोषणास कारणीभूत सामाजिक-आर्थिक घटक:**

**१. दारिद्र्य:** कमी उत्पन्नामुळे सकस आहार घेणे अनेक कुटुंबांना शक्य होत नाही. परिणामी बालकांना आवश्यक पोषक तत्वे मिळत नाहीत.

**२. पालकांचे शिक्षण:** अशिक्षित पालकांना संतुलित आहार, लसीकरण व आरोग्यसेवेचे महत्त्व पुरेसे माहित नसते.

**३. आरोग्य सुविधा:** दुर्गम भागात आरोग्य केंद्रांची कमतरता असून नियमित तपासणी होत नाही.

**४. आहार पद्धती:** एकसुरी व अपूर्ण आहार पद्धतीमुळे पोषणतत्त्वांचा अभाव दिसून येतो.

**५. शासकीय योजनांची अंमलबजावणी:** एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS), अंगणवाडी, मध्यान्ह भोजन योजना यांचा लाभ सर्व बालकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत नाही.

**संशोधनातील प्रमुख निरीक्षणे**

1) आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण जास्त आढळते.
2) कमी उत्पन्न व अशिक्षण यांचा कुपोषणाशी थेट संबंध आहे.
3) शासकीय योजनांची अंमलबजावणी अपुरी आहे.
4) मातांच्या आरोग्याचा बालकांच्या पोषणावर महत्त्वपूर्ण परिणाम दिसून येतो.

**सूचना व उपाययोजना:**

1. कुपोषण निर्मूलनासाठी बहुविभागीय (Multi-sectorial) धोरण राबवावे.
2. आदिवासी भागांसाठी स्थानिक गरजांनुसार पोषण कार्यक्रम आखावेत.
3. मातृ शिक्षण, पोषण साक्षरता व आरोग्य सेवांवर विशेष भर द्यावा.
4. ICDS व इतर योजनांचे परिणामाधारित मूल्यमापन (Outcome-based Evaluation) करावे.
5. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था व समुदायाचा सक्रिय सहभाग वाढवावा.

**सारांश:**

सदर संशोधनातून हे स्पष्ट होते की, पालघर जिल्ह्यातील बालकांमधील कुपोषण ही केवळ आरोग्याशी संबंधित समस्या नसून ती सामाजिक, आर्थिक व संरचनात्मक घटकांशी निगडित आहे. दारिद्र्य, मातांचे अशिक्षण, अन्नसुरक्षेचा अभाव, अपुरी आरोग्य पायाभूत सुविधा आणि धोरण अंमलबजावणीतील मर्यादा या घटकांमुळे कुपोषण टिकून आहे. सांख्यिकीय विश्लेषणातून सामाजिक-आर्थिक घटकांचा कुपोषणावर लक्षणीय प्रभाव सिद्ध झाला आहे. त्यामुळे केवळ पूरक आहार पुरवठा न करता व्यापक सामाजिक-आर्थिक सुधारणा आवश्यक आहेत.

**संदर्भसूची:**


1) वेबसाईट- https://mr.vikipedia.in
2) वेबसाईट- https://mr.vikipedia.in
3) वेबसाईट- https://mr.vikipedia.in
4) भारत सरकार, महिला व बाल विकास मंत्रालय – ICDS अहवाल
5) राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS)
6) महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग अहवाल
7) संशोधन लेख व पुस्तके
8) पालघर जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी २०२२-२३, पृ. क्र. २०८